# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>
## प्रेस नोट दि.०१/११/२०१८
## <u>दि.३१/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३९०/१८,भादविक ३०७,३२४,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,भारतीय हत्यार कायदा ३,४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)सह १३५ |
| **फिर्यादी** | मंदार धुमाळ,वय-२६ वर्षे,रा.१३४, शुक्रवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | एकुण १२ ते १३ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१०/२०१८ रोजी १५/३० ते १५/४५ वा.चे दरम्यान पायगुडे वाईन्स समोरील उमरदंड चौक,शिंदे आळी शुक्रवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रांसोबत गप्पा मारत थांबले असताना,फिर्यादी यांचे ओळखीचे नमुद इसम व इतर साथीदार यांनी फिर्यादी यांचा भाऊ मंगेश धुमाळ,फिर्यादीचे मित्र गणेश दारवटकर यांना लाथा-बुक्यांनी मारहाण करून,कोयत्याने फिर्यादी यांचे डावे हाताचे बोटावर व मंगेश धुमाळ याचे डोक्यावर व हातावर वार करून,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने रिव्हॉलव्हरमधुन तीन राऊंड फायर करून,त्यापैकी एक राऊंड मंगेश धुमाळ याचे उजव्या पायास लागुन,त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमाजी राठोड ८८०५१६२९१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३९१/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,भारतीय हत्यार कायदा ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | रुपेश पाटील,वय-३६ वर्षे,रा.शुक्रवार पेठ,शिंदे आळी,पुणे |
| **आरोपी** | १.मंदार दिलीप धुमाळ,वय-२६ वर्षे,रा.१३४,धुमाळ निवास,शुक्रवार पेठ,पुणे २.गणेश सतीश दारवटकर,वय-२५ वर्षे,रा.३३२,शुक्रवार पेठ,पुणे ३.अभिजीत चंद्रकांत मोहिते,वय-३२ वर्षे,रा. साई सदन बिल्डींग,मोडक वस्ती,जांभूळवाडी,पुणे ४.आकाश पुरुषोत्तम सापा,वय-२७ वर्षे,रा. १०५८,भवानी पेठ,पुणे (अटक) ५.मंगेश दिलीप धुमाळ,वय-३३ वर्षे,रा.१३४,धुमाळ निवास, शुक्रवार पेठ,पुणे (जखमी आहे) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१०/२०१८ रोजी दुपारी १५/३० ते १५/४५ वा.चे दरम्यान पायगुडे वाईन्स समोरील उमरदंड चौक,शिंदे आळी,शुक्रवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे साथीदार १.संग्राम खामकर २.स्वप्निल दाते ३.विशाल गुंड यांचेसह स्वप्निल दाते याचे गणेश दारवटकर व धुमाळ यांचेशी झालेल्या भांडणाचा समझोता करण्या साठी गेले असता,यातील नमुद इसमांनी फिर्यादी व विशाल गुंड यास शिवीगाळ करुन, फिर्यादी यांचे डोक्यात कोयता मारुन,विशाल गुंड याचे हातावर कोयता मारुन,त्यांना गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विजयकुमार शिंदे ९८२१११८६५४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५७०/१८,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | संदिप यादव,सहा. पोलीस निरीक्षक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | कु.स्नेहांकिता हनुमंत बारणे,वय-१८ वर्षे,रा.मुं.पो.राजगुरुनगर,कोहिनुर रेसीडेन्सी वाडा रोड ता.खेड,जि.पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०६/२०१८ रोजी २२/०० वा. मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग पुणेकडुन भोरकडे जाणारे कात्रज नवीन बोगदयाचे आंत रोडवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | भारती विदयापीठ पोलीस स्टेशन अकस्मात रजि नं.१०६/२०१८,सीआरपीसी १७४ चे अन्वये एकंदरीत झाले तपासावरुन कु.स्नेहांकिता हनुमंत बारणे,वय-१८ वर्षे हिने तीचे ताब्यातील मोपेड ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद वेळी व ठिकाणी मोपेडवर तीची मैत्रीण पुनम सुंदर सुनार,वय-१९ वर्षे,धंदा शिक्षण,रा. मुं.पो.वेळु,ता.भोर,जि.पुणे हिस पाठीमागे बसवुन जात असताना,तीचे मोपेडवरील नियंत्रण सुटुन ती स्वतः मोपेडवरून घसरुन खाली पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाली. तसेच तीचे गाडीचे पाठीमागे बसलेली पुनम रामसुंदर सुनार हिस गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ताटे ९९२२४४८१०० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५६५/१८,भादविक ३५३,३२३,५०४,५०६(१),३४ |
| **फिर्यादी** | पो.उप.निरी. सुबराव लाड, दत्तवाडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | निलेश मधुकर वैद्य,वय-२१,रा.सनं.२०,लगड मळा,वडगांव-खुर्द,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/१०/२०१८ रोजी १२/१५ वा. दत्तवाडी वाहतुक विभाग पुणे शहर येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दत्तवाडी वाहतुक विभाग येथे त्यांचे सरकारी कर्तव्य करीत असताना, यातील नमुद इसम निलेश वैद्य याचे ॲक्टीवा गाडीवर कारवाई केल्याचा राग मनात धरून, त्यांनी फिर्यादी सोबत वाद घालुन,तुम्ही यापुर्वीही माझ्या गाडीला जॅमर लावलेले होते. तुम्ही नोकरी कशी करता ते बघतो असे बोलुन,फिर्यादी यांचेबरोबर झटापटी करुन ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे . |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धुमाळ ८६९३८८८५१२ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १२२६/१८,भादविक ४१९,४२०,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक परूष,वय-३४,रा.महादेवनगर,मांजरी-ब्रुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँकेचे खातेधाकर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/२०१८ रोजी १३/१५ वा.ते दि.११/०९/२०१८ रोजीपर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईल व बँकेचे खातेधाकर यांनी संगनमत करून,विविध मोबाईल नंबरवरून वेळोवेळी फिर्यादी यांना फोन करुन,तुमचे प्रोफाईल गोल्ड क्लब पोर्टलमध्ये वल्ड डेंटिंग सर्व्हिसेस मध्ये दिसत असुन,तुमचे एका मुलीशी लिंक झाले आहे असे सांगुन,जर सदर पोर्टल मधुन तुम्हास बाहेर पडायचे असेलतर तुम्हाला काही फी भरावी लागेल, नाही तर लिंग झालेली मुलगी ही तुमच्या विरुद्ध तक्रार करेल असे त्यांना सांगुन,फिर्यादी यांना वेळोवेळी पैसे भरण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांची एकुण ६,५९,८००/- रुपयेची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा सायबर क्राईम येथे केलेल्या तक्रारी अर्जावरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी. हमराज कुमांर (गुन्हे) ९६५७१२१२७१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**